# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र. २६४ / २०१३

पुणे विद्यापीठातर्फे ''प्रा. जी. बी. कुलकर्णी अवॉर्ड फॉर दी बेस्ट टिचर इन कॉमर्स'' पारितोषिक दरवर्षी पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील तीन जिल्हयांमध्ये आलटून पालटून दिले जाते. शैक्षणिक वर्ष २०१३–१४ वर्षासाठी नाशिक शहर व जिल्हयातील वाणिज्य शाखा असलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. **अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ६ जानेवारी, २०१४ आहे.** सदरचे अर्ज शैक्षणिक प्रवेश विभागाकडे प्रत्यक्ष हस्तपोच सादर करावे.

पारितोषिकासाठी आवश्यक असलेले नियम, अटी व इतर माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१) पारितोषिकाचे नांव : **''प्रा.जी.बी.कुलकर्णी अवॉर्ड फॉर दी बेस्ट टिचर इन कॉमर्स''**

२) पारितोषिकाची रक्कम **रुपये १,६००/–**

३) पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील ज्या महाविद्यालयात वाणिज्य अभ्यासक्रम शिकविला जातो, त्यांच्या प्राचार्यांनी वाणिज्य विषयातील पात्र शिक्षकाची (फक्त एकच) शिफारस करावी. (मा. अधिष्ठाता, मा. शैक्षणिक विभागप्रमुख व मा. प्राचार्य या पारितोषिकासाठी अर्ज करु शकतात.)

४) पुणे, मुंबई किंवा इतर कोणत्याही मान्यवर विद्यापीठाची एम. कॉम. पदवी प्रथम प्रयत्नात किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

५) पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील संलग्न महाविद्यालयात वाणिज्य विषय शिकविण्याचा कमीतकमी दहा वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६) संबंधित शिक्षकास संशोधनात्मक प्रबंध, त्यासंबंधीचे प्रकाशन अथवा संशोधनात्मक लेखन इत्यादीचा अनुभव असावा.

७) संबंधित शिक्षकाचा महाविद्यालयातील चांगल्या कार्यक्षमतेचा व वर्तणूकीसंबंधीचा गुप्त अहवाल मा. प्राचार्य यांनी अर्जासोबत पाठविणे आवश्यक आहे. इतर कोणतेही उल्लेखनीय योग्यतेच्या कार्याचा अहवाल सादर करावा. (सोबत पाकीटावर गोपनीय अहवाल असा उल्लेख करावा.)

८) विद्यापीठातील विभागप्रमुख किंवा महाविद्यालयाच्या प्राचार्यांना स्वत:चा प्रस्ताव पाठवावयाचा असल्यास तो मा. विभागप्रमुखांनी मा. कुलगुरु यांच्यामार्फत व मा. प्राचार्य यांनी संस्था चालकांमार्फत पाठवावा.

९) प्राध्यापक हा पूर्णवेळ कार्यरत असणे आवश्यक आहे.

१०) हे पारितोषिक सन २०१३–१४ या वर्षासाठी फक्त **नाशिक** शहर व जिल्हयातील संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांसाठी राहील.

सदरचा पारितोषिक वितरण समारंभ हा प्रतिवर्षी पुणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनी (दि. १० फेब्रुवारी, २०१४) आयोजित करण्यांत येईल.

(signature) १९/१२/२०१३
सहा.कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/८८३८
दिनांक : १९-१२-२०१३

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :
१) मा. प्राचार्य, पुणे शहर व जिल्हयातील संलग्न वाणिज्य महाविद्यालये.